# फळशास्त्र विभाग
## उद्यानविद्या विद्याशाखा
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.वि.प्र./ फ.शा./प्रक्षेत्र /लिलाव/११९० /२०२६

दि. २५/०२/२०२६

### जाहिर लिलाव सुचना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत फळशास्त्र विभागामध्ये चिकू फळ बहाराचा जाहिर लिलाव दिनांक १०/०३/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता फळशास्त्र विभागाच्या प्रक्षेत्र कार्यालय येथे करण्याचे ठरविले आहे. लिलावात बोली बोलणा-यास रूपये १000/-अग्रीम रक्कम जमा करावी लागेल त्याशिवाय बोली बोलता येणार नाही. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या रक्कमेस लिलाव समिती मंजुर करेल व लिलाव समितीच्या शिफारसीनुसार अधिष्ठाता (उद्यानविद्या) डॉ.पंदेकृवि., अकोला यांची लिलाव किंमतीला मंजुरी घेतल्यावरच लिलाव पुर्ण होईल.

तरी इच्छुक खरेदी दारांनी ठराविक वेळेवर लिलावास हजर रहावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## चिकू फळ बहारजाहिरलिलाव २०२५-२६

### अटी व शर्ती

१. फळशास्त्र विभागाच्या प्रक्षेत्रावरील चिकू फळ बहार जाहीर लिलाव दि. १०/०३/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात येईल.

२. लिलावाचे अगोदर संबंधितानी प्रभारी अधिकारी, प्रक्षेत्र, फळशास्त्र विभाग यांच्याशी संपर्क साधून क्षेत्राचे अवलोकन करून घ्यावे.

३. ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी बोली बोलणारे हजर असल्यास त्याचदिवशी त्याठिकाणी अर्ध्या तासांनी लिलाव करण्यात येईल. एकच बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा निर्णय लिलाव कमेटी घेईल.

४. लिलावात बोली बोलणा-यास रु. १०००/- अग्रिम रक्कम जमा करावी लागेल त्याशिवाय लिलावात बोली बोलता येणार नाही.

५. लिलावाची रक्कम एका हप्त्यामध्ये जमा करावी लागेल पहिला हप्ता लिलाव मंजूर झाल्यापासून तीन दिवसाचे आत कार्यालयात जमा करावा लागेल त्याचप्रमाणे अधिष्ठाता , (उद्यानविद्या) हयांची मंजूरी मिळाल्यानंतरच लिलाव पूर्ण होईल व त्यानंतरच अमानत रक्कमेची पावती फाडता येईल अमानत रक्कम ही हप्त्यामध्ये वळती करण्यात येईल.

६. लिलावाची योग्य किंमत न झाल्यास लिलाव रद्द करण्याचा निर्णय लिलाव कमेटी घेईल.

७. फळे तोडून नेण्याची शेवटीची तारीख ३०/०५/२०२६ ही राहील.

८. पैसे भरण्याची तसेच फळे तोडण्याची मुदत **१० ते १५** दिवसांनी वाढवून देण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता (उद्यानविद्या) यांना राहतील.

९. लिलाव झालेल्या प्रक्षेत्रावरील फळे नेणाऱ्या व्यक्तीची यादी संबंधित प्रभारी अधिकारी यांना कळवावी लागेल आणि तीच व्यक्ती सदर बहार फळे नेऊ शकेल. त्याच व्यक्तीला विभागातून परवाना पास दिल्या जाईल. एकावेळी जास्तीत जास्त दोन व्यक्तींना पास दिल्या जाईल.

१०. फळे शेवटच्या म्हणजे तिस-या बोलीची लिलाव किंमत लिलाव कमेटी मंजूर करेल व लिलाव कमेटीच्या शिफारसीनुसार मा. अधिष्ठाता (उद्यानविद्या) डॉ. पंदेकृवि. अकोला यांची लिलाव किंमतीला मंजूरी घेतल्यानंतर लिलाव पूर्ण होईल.

११. अग्रीम रक्कमेचे पैसे पहिल्या दोन खरेदीदारा व्यतीरीक्त सर्वांना त्याचवेळी परत करण्यात येईल. लिलावाची अर्धी रक्कम ज्यांनी लिलाव घेतला असेल लिलाव मंजूर झाल्यापासून सात दिवसाचे आत भरल्यास इतर एकाची अग्रीम रक्कम परत करण्यात येईल व जर त्याने पैसे भरले नाहीत त्याची अग्रीम रक्कम जप्त करण्यात येईल व पावती देण्यात / फाडण्यात येईल व

नं. 2 च्या खरेदीदाराच्या नावाची शिफारस करण्यात येईल व त्यानेही सात दिवसाचे आत पैसे भरले नाही तर त्याची अग्रीम रक्कम जप्त करण्यात येईल व पुन्हा लिलाव करण्यात येईल.

१२. लिलाव घेतल्यानंतर कार्यालयात जमा केलेली रक्कम कुठल्याही परिस्थीतीत परत करण्यात येणार नाही.

१३. नैसर्गीक आपत्ती मुळे फळाचे नुकसान झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१४. प्रयोगाकरीता विभागास किमान ५० किलो फळे विनामुल्य द्यावी लागतील.

१५. प्रयोगाकरीता फळे समाविष्ठ असल्यामुळे तोडतांना कार्यालयाची परवानगी घ्यावी लागेल.

१६. कोणत्याही कारणास्तव लिलाव घेणारा किंवा बागेतील अधिकारी हयांच्या मध्ये वाद निर्माण झाल्यास मा. अधिष्ठाता (उद्यानविद्या) हयांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१७. बोली झाल्यानंतर सर्वोच्च बोली लावणाऱ्याला पुढील पाणी व्यवस्थापन करावे लागेल.

१८. झाडावरील फळे तोडताना झाडांना हानी पोहचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय मा. विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग यांचा राहील.

१९. झाडांची रखवाली ठेकेदारास स्वत: करावी लागेल. राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल. तसेच ठेकेदारास फळबागेमध्ये फक्त तात्पुरते रखवाली मचान स्वखर्चाने करावे लागेल, ठेकेदारास फळे तोडून नेण्याचे अंतिम तारखेपर्यंत कायम वास्तव्याची व्यवस्था करता येणार नाही.

वरील १ ते १९ अटीचे उल्लंघन झाल्यास विद्यापीठ एकतर्फी निर्णय घेवून लिलावातून मुक्त होईल.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला